


REFBK-0007834

REFBK-0007834

९५५२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९२७५

# शुक्लांचीं गाणीं



केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

# शुक्लांचीं गाणीं

ध्वनि-मुद्रित
गीतांचा संग्रह

— रा. ह. शुक्ल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0007834
REFBK-0007834

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य आठ आणे

सर्वाधिकार
सुरक्षित

*

प्रथमावृत्ति
जून
१९५२

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक
मुद्रणालय
मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे
श्रीसमर्थ-सदन
मुंबई ४

७७/२५४

# गीतारम्भ – सूचि


१ आनंदीआनंद अखंड भरला २७
२ आम्ही शेतकरी शेतकरी ! ४७
३ आली दिवाळी दिवाळी ! २४
४ आली वसन्तबहार ! ३६
५ उधळी सुखशान्ति-सुधेला १३
६ कर ना जो जो गाई १९
७ करुणाघना, दे भगवाना ! ३३
८ कलिके, उमलूं नको गे ! ४४
९ कशि बाई दुनिया डोले, फुले ! २६
१० कां जीवाला जिंकियलें ? १२
११ किती बाई मधुर कलिका ही ! ३४
१२ कुठें शोधुं तुला सख्या मोहना ? १३
१३ कुणीकडे कशी गडे लागे नाव ? ३९
१४ कोठें गुंतलासी पंढरीच्या राया ? ४२
१५ खवळे सागर, डगमग डोले नौका ! ३०
१६ खोटा मायेचा फोल जगींचा पसारा २१
१७ गुंफूं या गडे, प्रीतीचे गजरे ! ८
१८ गोड तुझा सहवास सखे ग ! १२
१९ चमकती ह्या वायां २९
२० चला, राबुं या शेतावरती ! ४५
२१ चांद हंसरा पुनवेचा २८
२२ चांदरात मोही मनाला ३३
२३ जगीं आसरा प्रभूचा खरा २०
२४ जगिं खेळत प्रभुराया ६
२५ जाऊं कुठें सोडुनी तव चरणां ? २२
२६ जादुगिरी नयनीं थोर २८
२७ जीवनीं उसळला प्रळय-पसारा ३८
२८ झुळझुळ वाहे चंद्रभागा ! ९
२९ डुले खुले वसुधाराणी १८
३० तुझ्या कृपेचा जिवा निवारा ३५
३१ दाटलें काळजांत काहूर २२
३२ दिलदारा जादुगारा ! ३०
३३ दे चरणिं आसरा देवा ! ३४
३४ दे पदीं आसरा ह्या जना ३६
३५ देव भावाचा भुकेला ४२
३६ देव माझा जीव राजा २३
३७ दोघांची दुनिया निर्मुनियां २६
३८ दो दिसाचा पसारा संसार ३२
३९ धरलास उगाच अबोला ३८
४० नको नको रे उडवूं अंगावरी १७
४१ नाभिं हंसली चंद्रिका चकोरा ! ६
४२ नाचती ओठांवरी हे बोल १६
४३ नाजुक ही फुलवेल ! २१
४४ ना वरी संभ्रमा १६
४५ निवारा युवती–प्रीति नरा ४५
४६ नंदाघरीं आला हरी ४०

४७ पांखरा ! चल जा, उडुन जा ३७
४८ पूजा ढांसळली २०
४९ पंढरीचा राणा पांडुरंग गावा ७
५० बग धन-दौलत माजी ४१
५१ बघ, डुले झुले कलिका ही ३७
५२ बहुमोल मनुज-जीवित हें ४८
५३ भारत माझा देव, धर्म, राजा ! ३३
५४ मजला माहेरासी न्या हो ! ३१
५५ मन रमे गायनीं मोहली ५
५६ मनुजा, विठ्ठल विठ्ठल छंद २७
५७ माझा नव नवसाचा भाऊराया २५
५८ माझ्या बागेंत आला ग माळी ४६
५९ मी कसें तुझ्यावर प्रेम करूं ? १०
६० मुशाफरीचा ये देवा ! पुरा वीट ४४
६१ मोहना, माधवा ! वाजिव मुरली २३
६२ यमुना सांवळी ! राधा गोरी ! १५
६३ येणार कधीं राया ? १९
६४ रघुनंदना राया ! २९
६५ रघुराज मनीं वदनीं वसला ३४
६६ रघुराजा माझा विसांवा ९
६७ रजनी गाई मधु अंगाई १४
६८ लावुनि आशा खुळ्या जिवाला ३५
६९ वदनचंद्र हंसरा तव सुंदर ८
७० विटेवरी मूर्ति तुझी सांवळी ३२
७१ विश्व हांसलें भासलें सख्या ! १८
७२ श्रीरामनाम प्रिय झालें ३१
७३ सखा श्रीहरी उद्यां प्रभातीं ११
७४ सती-चरित नित नितांत सुखकारी २९
७५ सिंगल खोली दे भगवान् ! ४३
७६ सुखमय हा संसार सदा २८
७७ हळुं बोल ग मैना ! १४
७८ हांसती ह्या उपहासें तारा ४१
७९ हे पंढरीच्या राया ! ७
८० ह्या तारका सुरबालिका १७
८१ ह्या इथें मी सेंविलें तें स्वर्गसुख ४६


★

आवक १२९५ स्थळ प्रत
मराठी ग्रंथ संग्रहालय ... स्थळ प्रत
५६३८



# मन रमे गायनीं

मन रमे गायनीं मोहरुनी
घुमतसे नाद हृदयीं भरुनी !

मंगलमय सुप्रभातकालीं
शांतिरसानें सृष्टि नहाली
विश्ववृत्ति आनंदित झाली
फिरत मी परि वनीं झुरत मनीं !

मधु मंगल संगीत – मोहिनी
गात बसे वनिं लपुनी छपुनी
अमर-गुणी गंधर्व का कुणी ?
जग भारितसे किमया करुनी !

अनंत मरणें संतत साहिन
परंतु धुंडुनि नयनीं पाहिन
तुला गायका, जीवित वाहिन
जाईन दिव्य गायनीं विरुनी !

*गायिका :*
*सौ. माणिक वर्मा*

★

सुंबई – नभोवाणी – केंद्रावरून जुलै १९५१ मध्यें 'महिन्याचें गीत' म्हणून हें गाणें प्रत्येक शुक्रवारीं ध्वनिक्षेपित केलें गेलें होतें.

# प्रीतीचे गजरे !

गुंफूं या गडे, प्रीतीचे गजरे
मोहक नाजुक न्यारे
फुलमालिण मी राधाबाळी
तूं माझा वनमाळी !
झगमग झगमग तेज झळाळे
चं दे री दु नि ये चें !

मंजुळ पैंजण वाजति रुणझुण
कां चंद्रिका नभीं नाचे ?

किती गगनांगणिं खुलति साजरे
मंगल हंसरे तारे !
आशेचे नव सुंदर फुलले
हे तेजाळ फुलोरे !

च ल व निं ल ग ब ग
कां मनिं तगमग ?
आनंदलें विश्व सारें !
गुंफूं या गडे, प्रीतीचे गजरे !

*गायिका :*
राजकुमारी

★

[ राग : रागेश्वरी ; ताल : त्रिताल ]

वदनचंद्र हंसरा तव सुंदर
हृदय-सिंधु हा झुलवि निरंतर !
प्रणयकला सखि, फुलवित अंतर
चंद्रकला नव जशी नीलांबर !

*गायक :*
जे. एल्. रानडे

★



# झुळ झुळ वाहे चंद्रभागा!

[ राग : कालंगडामिश्र ;  ताल : धुमाळी ]

झुळझुळ वाहे चंद्रभागा !
जीव गुंगवित
भाव रंगवित
पावन जीवन-रस-रंगा
झुळझुळ वाहे चंद्रभागा !

प्रकटलीच तव पांडुरंगा !
वा त्स ल्या ची गं गा
धुंद करितसे अंतरंगा
थयथय थयथय नाचत डोलत
दाविसि लीला श्रीरंगा !
झुळझुळ वाहे चंद्रभागा !

*गायक :*
*जी. एन्. जोशी*

★

रघुराजा माझा विसांवा
हृदयाचा माझा विसांवा
रघुनंदन आनंदकंद हा
जडवी सुंदर छंद अपुला !

सुखशांति देतसे जीवा
भुलला प्रभु निर्मळ भावा
शरण मी सदा रामपदाला !

*गायक :*
*सुरेश हळदणकर*

★

# कसें तुझ्यावर प्रेम करूं ?

मी कसें तुझ्यावर प्रेम करूं ?
कां मोहजाल फसवें पसरूं ?

उजाड झाला बगिचा सारा
झडून गेला पार फुलोरा
उरला कांट्यांचाच पसारा
कळ्याफुलांना नुरला थारा

गेंद गुलाबी कुठले आणूं ?
कसा तुझा सत्कार करूं ?

नाशुनि आकांक्षा – अभिलाषा
जिवास बिलगत निशा निराशा
भरल्या नयनीं तुफान नाचे
तरळति कणकण भग्न मनाचे

तुजसाठीं मृत जीवनांत ह्या
नव संजीवन कुठुनि भरूं ?

गीत मनींचें मनींच विरलें
स्मित अधरींचें अधरीं जिरलें
कुंद जहरली रात काजळी
तुझें आगमन भलत्या वेळीं !

जहराचें अमृत करण्याची
खुळी हांव मी कैंवि धरूं ?
मी कसें तुझ्यावर प्रेम करूं ?

गायिका :
विमल दिघे

★



# कधीं कान्हा दिसेल पुन्हा?

सखा श्रीहरी उद्यां प्रभातीं मथुरेला जाणार !
घोर काजळी रात्र गोकुळीं नित्याची येणार !
कधीं कान्हा दिसेल पुन्हा ह्या नयनां ?

अमंगळ ना मुळीं उगवो
उद्यांची ती उषा देवा !
न होवो दूर दृष्टीला
जिवाचा प्रीतिचा ठेवा
कधीं कान्हा दिसेल पुन्हा ह्या नयनां ?

अतां कानीं मनीं कुठुनी
घुमावा जादुचा पावा ?
फुलावा जीव हरिसंगें
कसा हा कुंज उमलावा ?
कधीं कान्हा दिसेल पुन्हा ह्या नयनां ?

उगिच कां राधिके, झुरशी ?
गडे, तूं किति खुळी भोळी !
निरंतर रंगला तुझिया
हृदय-कुंजांत वनमाळी !
श्याम आला, बंसीवाला श्याम आला !

गायिका :
लता मंगेशकर
[ नंदकिशोर ]

★

# गोड तुझा सहवास !

गोड तुझा सहवास
सखे ग, गोड तुझा सहवास !
तव सहवासा जीव भुकेला
घडे परी उपवास

बहु यशोधनें, सौख्यसाधनें
तिळ न उणें विभवास !
परी अभांगी मी विरागी
गमे बरा वनवास

समज तुजविणें मरण मज जिणें
कष्टद जगीं प्रवास !
धन्यचि जीवन जरी मिळे क्षण
तुझा नि माझा श्वास !

गायक :
जी. एन्. जोशी

★

[ राग : भैरवी ; ताल : केरवा ]

कां जीवाला जिंकियलें
हांसत खेळत वश केलें ?
कशी माझी मी नच उरलें ?
राया, तुझीच झालें !

प्रीतिचा जिव्हाळा
जीवनाला दे उजाळा
तुझें आणि माझें
जग नवलाचें रंगलें !

गायक :
सुरेश हळदणकर

★



# कुठें शोधुं तुला?

कुठें शोधुं तुला सख्या मोहना !
रुसलास उगिच कां? बो ल ना
स ख्या, बो ल ना !
तुझ्याविना करमेना
व्याकुळला हा जीव रमेना
मधुवनिंचा कुंज फुलेना
यमुनाजळही वाहिना
झणिं धांवुनि ये यदुनंदना !
लपलास कुठें मधुसूदना ?
पहा कसा उदास हा
विश्वपसारा सुनाच सारा
पंचप्राण नयनांत उभे
दर्शन दे रे कान्हा !
वाजिव मुरली मनरमणा !
झणिं धांवुनि ये यदुनंदना !

*गायिका :*
*लता मंगेशकर*
[ नंदकिशोर ]

★

[ राग : काफी ; ताल : त्रिताल ]

उधळी सुखशांति-सुधेला
चवथीचा चंद्र उदेला !
गगनांगणिं हा रांगत आला
विश्वजननीचा गोंडस छकुला
सदा विमोही वसुधेला !

*गायिका :*
*गंगूबाई हनगळ*

★

# हळुं बोल ग मैना !

[ राग : बिहाग – यमन ; ताल : केरवा ]

हळुं बोल ग मैना !
गडे थांब, जरा थांब,
कुणि ऐकेल ना ?

डोळ्यांनींच बोलूं या
अपुलें हृदय खोलुं या
लपवुं या, छपवुं या
तुझी माझी ग प्रीति अमोल !

ही शुक्राची चांदणी
कशि हंसते गगनांगणीं
ऐकून चोरटे गोड प्रीतिचे बोल !
हळुं बोल ग मैना !

*गायिका :*
*वासंती*

★

[ राग : पिलूमिश्र ; ताल : धुमाळी ]

रजनी गाई मधु अंगाई
दुनिया निजली निवांत बाई !
हंसऱ्या कलिका मिटती नयना
झोपल्याच बघ ना राघू-मैना
चं द्र मा चां द ण्या ही !

वाजवि मंजुळ अलगुज वारा
नाचति छुम छुम तारा
नीज राजसा ! चिमण्या मोरा !
कर जो जो गाई !

*गायिका :*
*वासंती*

★

शुक्लांची गाणीं...



# यमुना सांवळी,

सखी : यमुना सांवळी ! राधा गोरी !
नयनचंद्राची बाई गोजिरी चकोरी !
राधा : गवळण ही साधी भोळी
छळुं नका उगीच बिचारी
यमुनेच्या चंचळ लहरी
तशा तुम्ही अवखळ भारी
सखी : चतुर तूं ग राधाराणी
करिशि हृदय-चोरी !
राधा : चला जाऊं लगबग बाई
बोलतील सासूबाई !
सखी : ( सासूबाई ?... ऊं ... हूं ! )
दुसरंच कोणी तरी
वाट हिची पाहत राही
गोरट्या ग गालांसंगें
लाज खेळे होरी !
राधा : निर्मळ किति यमुनाजळ हें
अमृत जणुं झुळझुळ वाहे
घट भरून मी तर जातें
तुम्ही खुशाल थांबा येथें
सखी : गवळणी ग ! चाल जपून
अमृतघट सांभाळून
द्रिष्ट तुला लाविल कोणी
गडे व्रजकिशोरी !

*गायिका :*
*लता मंगेशकर*
व इतर
[ नंदकिशोर ]

# तें तुझ्या स्वाधीनचें !

नाचती ओठांवरी हे
बोल वेड्या प्रीतिचे
ऐकुनी घेणें न घेणें
तें तुझ्या स्वाधीनचें !

प्रेम माझें कां, कसें हें
मी किती वर्णायचें ?
प्रेम तूं दावी, न दावी
तें तुझ्या स्वाधीनचें !

प्राणपुष्पांचाच झेला
मीं तुझ्या हातीं दिला
झेलणें, लाथाडणें वा
तें तुझ्या स्वाधीनचें !

गुंगलेल्या ह्या जिवाला
प्रीतिचें गाणें रुचे
साथ देणें, कीं न देणें
तें तुझ्या स्वाधीनचें !

गायिका :
सौ. ज्योत्स्ना भोळे

★

[ राग : देस ; ताल : त्रिताल ]

ना वरी संभ्रमा
मिरवित घिजयध्वज
ह्या जगीं प्रेमा !

प्रमुदिता बालिका
सहचरी नांदते चंद्रिका
जरि वरि लांछना चंद्रमा !

गायक :
जी. एन्. जोशी

★



# नको रे उडवूं अंगावरी

नको नको रे उडवू अंगावरी
रंगभरी पिचकारी
फेकूं नको रे मुखावरी
गुलाल-रंग हा गिरिधारी!

प्रीतिरंगीं रंगल्या ह्या गुंगल्या
धुंद झाल्या गोपिका
सावळा हा गोवळा हा
नाचे कुंजविहारी!

रासरंगि रंगविशी
अंतरंग रे!
रंगाविशि पुन्हा कशासि
अंग अंग रे?
सांग सांग रे, श्रीरंगा, सांग रे!
पुरे खट्याळा, अवखळ चाळा
नवलाचा सुखकारी!

*गायिका :*
***लता मंगेशकर***
व इतर
[ नंदकिशोर ]

★

[ राग : मालकंस ; ताल : त्रिताल ]

ह्या तारका सुरबालिका
नाचति गगनांगणीं सुखदा
उधळोनियां जगदांतरीं ह्या
निज कांति-माया, शांतिसुधा!

*गायक :*
***जी. एन्. जोशी***

# पूजा ढांसळली !

[ राग : भीमपलासमिश्र ; ताल : दादरा ]

पूजा ढांसळली
माझी पूजा ढांसळली !
भावभक्तीनें बांधलेली
मातिला मिळाली !

जों न फुलोरा पुरता चढला
देव दिलाचा कोठें दडला ?
रिकामाच देव्हारा पडला
ज्योत जिवाची विझुन चालली
आशा मालवली !

प्रभु-भेटीचा छंदच जडला
जिवाशिवाचा योग न घडला
हार गुंफितां अरधा अडला
शाप कुणाचा कधिंचा नडला ?
स्वप्नें मावळलीं !

गायिका :
सौ. विजया देसाई

★

[ राग : पटदीप ; ताल : त्रिताल ]

जगीं आसरा प्रभूचा खरा
पाश-पसारा नाशवंत सारा
हा भवसागर पार कराया
शांतिसुखाचा पंथ वराया
राम-नाम-नौका थारा !

गायक :
जे. एल्. रानडे

★

# नाजुक ही फुलवेल !

[ राग : तिलककामोदमिश्र ; ताल : दीपचंदी ]

नाजुक ही फुलवेल !
हिचा सुटे जीवाधार
उन्मळला सहकार
हिला जरी अव्हेराल
देवाघरीं दोषी व्हाल !

उभी अंगणांत दारीं
दैव साधी दावेदारी !
पांखडतां आग पुन्हां
काय केला हिनें गुन्हा ?

करूं नका हेळसांड
मांडील ही जीव-सांड
सोबतीण चार दीस
माती मिळेल मातीस !

*गायक :*
*जी. एन्. जोशी*

★

[ राग : भैरवी ; ताल : केरवा ]

खोटा मायेचा फोल जगींचा पसारा
भुलला जीव वायां ह्या संसारा !

जिवा निवारा प्रभुराज खरा
दुसरा नाहीं आसरा
चिर शांतिसुखाचा ठेवा सारा !

*गायिका :*
*सीता माइनकुर्वे*

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ग्रं. क्र. 7656 ...



# आली दिवाळी

[ राग : काफी – जिल्हा ;
ताल : केरवा ]

आली दिवाळी दिवाळी !
ल्याली नवा शिणगार
कसा भरदार ! किती गुलजार !

सुंदरा वसुंधरा खुले डुले
लेवुन दीपकहार
आनंदबहार लुटित अपार !

उजळले नव लाख दिवे
गगनांगणिं हे तेजाळ
झळाळति फार
बरसत संतत तेजोधार
नुरे अंधार
विश्वाचा सजला नवा संसार
सदा सुखसार !

चल ग सखे झणिं
आपण मिळुनी
गाऊं गाणीं ; करूं विहार
नाचूं या, खेळुं या,
करूं या मंगल जयजयकार !
माया अनंत रम्य उदार
प्रभुची अपरंपार
दश दिशांत नटे साकार !

नों. नं.





# भाऊराया आला

[ राग : झिंझोटी ; ताल : खेमटा ]

माझा नव नवसाचा बघ भाऊराया
आज आला भाऊबीज
साजरी कराया !

घालिन अभ्यंग स्नान
चमचमीत मग भोजन
जाइल झट पळुन जाण
शीण प्रवासाचा !

ओंवाळणी जीवप्यार
प्रेमाश्रूंचीच धार !
मज तिचेंच मोल फार
हृदया सुखवाया !

परतण्याची कां रे घाई ?
गोड गुपित कळलं ग बाई !
ओढ तुला लावित ही
वहिनीचीच माया !

गायिका :
सौ. साधना पैंगणकर

★

# श्रावणराजा आला !

कशि बाई दुनिया डोले, फुले !
साज तिला हा नवा हिरवा ग खुले !

श्रा व ण रा जा आ ला
नव बिजलीचें लेणें ल्याला
पाहुन मन हें भुलें, हुरळलें !
दु नि या डो ले, फु ले !

नाचत छुमछुम गाऊं सुस्वर
झिम झिम रिम झिम तालसुरावर
घेऊं झुल्यावर झोले
च ला ग बा ई !
दु नि या डो ले, फु ले !

गायिका : मीनाक्षी

★

[ गझल ; ताल : धुमाळी ]

दोघांची दुनिया निर्मुनियां
कां बावरला हा जीव वृथा ?

नच दोन जिवांची भेट घडे
जग आड पडे दोघांत अतां !

भय कांट्यांचे कां तुला ?
बोल बुल्बुला !

ह्या गुलाबफुला उरिं धरितां
कां बावरला हा जीव वृथा ?

गायिका : विमल वाकडे

★

# विठ्ठल – छंद !

मनुजा, विठ्ठल विठ्ठल छंद
मधुर निरंतर अंतरिं धरि रे !
जाईल तुटुनी हा भवबंध !

विठ्ठल-नामें चुकेल सारा
चौऱ्यांशीचा फेरा !
मायेचा अवघा पसारा
कां भुलशी संसारा ?

ह्या भवसागरिं तारक सकलां
विठ्ठल-नामच नौका !
संकटिं धांवुनि येइल विठ्ठल
ऐकुनि हृदयाच्या हांका !

गायिका :
विमल पत्की

★

आनंदीआनंद अखंड भरला
अवघा दश दिशां कोंदला !

संत–सज्जनांचा मेळा
भक्तिरंगानें रंगला

विठ्ठल–नामाचा गजर
पंढरी वैकुंठ भूवर

टाळ–मृदंग वीणा वाजे
पुण्य–सोहळा हा गाजे !

गायक :
व्ही. जी भाटकर

★

[ राग : भैरवी ; ताल : एकताल ]

जादुगिरी नयनीं थोर
प्रणयमूर्ति तूं किशोर !

निरखुनियां चंद्रकोर
नाचत हांसत भासत
हरखुनि मनिं हा चकोर !

*गायक :*
जे. एल्. रानडे

★

[ राग : मधुवन्ती, ताल : त्रिताल ]

चांद हंसरा पुनवेचा
हिणवी मला विरहिणीला !

गमल्या सुधेच्या धारा
अंगार अंगावर बरसला
हें चांदणें जाळी जिवाला !

*गायक :*
जे. एल्. रानडे

★

[ राग : जिल्हा-पिलु ; ताल : त्रिताल ]

सुखमय हा संसार सदा
लाभतां नरा प्रेमळ कांता
शा र दा च व र दा !

शांत सुशीला वरि सदाचार
भुवन-विभूषण श्री साकार
तु ल ना ना आ नं दा !

*गायक :*
*जी. एन्. जोशी*

★

# रघुनंदना !

[ राग : अलैयाबिलावल ; ताल : त्रिताल ]

र घु नं द ना  रा या !
तुज अनुसरुंदे मज प्राणसख्या,
प्रकाश तूं रे, मी तव छाया
तूं आत्मा, मी काया !

राजवैभवा त्यजुनि सजलें
मी व न वा स  व रा या
नको अयोध्या, मिथिला नगरी
सुखदच पंचवटी सखया !

*गायक :*
जे. एल्. रानडे

★

[ राग : काफीमिश्र ; ताल : त्रिताल ]

सती-चरित नित नितांत शुभकारी
प्रीतिबल सदा अतुल ; भय न वरी !

चुरिते कमला चरण-कमलां
शेषशायी जरि नाथ श्रीहरी !

*गायक :*
डी. व्ही. पलुस्कर

★

[ राग : बागेश्री ; ताल : त्रिताल ]

चमकती ह्या वायां उमलत्या तारा !

नभीं नाहिं शुणिला चंद्रिका ती
मन-मोहिनी बाला ;
नच चंद्रमा धाला !

*गायक :*
डी. व्ही. पलुस्कर

★

## मनचोरा !

दिलदारा जादुगारा !
कां रे होशी पाठमोरा ?
रुसलासी कां मनचोरा ?
उदास जिवास न चैन सख्या !

व्याकुळलें अन्तर झुरते
रात्रन्दिन बघ हुरहुरते
किति गांजतोस मज वायां ?
तुझा सहवास जिवास हवा !

नभिं चांद पहा पुनवेचा
हांसतसे दृष्टिसमोर
परि मम हृदयांत सदाचा
अन्धारच दाटत घोर !

तूं मधुकर, मी नव कलिका
मधु गुंजन थांबविशी कां ?
कशि बाई तुला नच माया ?
हांसून जरा तरी बोल सख्या !

गायिका :
विजया देसाई

★

खवळे सागर, डगमग डोले नौका !
नाहिं कुठें जीवास निवारा
मांडित तांडव वादळ-वारा
उगवे का प्रळयाची घटका ?

कुणी न साथी, दूर किनारा !
अंधाराचा घोर पसारा
मारूं कुणा हृदयाच्या हांका ?

गायिका :
सौ. विनोदिनी दीक्षित

★

# माहेरासी न्या हो !

मजला माहेरासी न्या हो !

देवा, मला मूळ धाडा
माझा जीव झाला वेडा
करुणा माझी येऊं द्या हो !
मजला माहेरासी न्या हो !

माझें माहेर पंढरी
आहे चंद्रभागेतीरीं !
माझीं बाप आणि आई
पांडुरंग—रखमाई !
किति विनवूं फोडुनि टाहो ?
मजला माहेरासी न्या हो !

गायिका :
ललिता परुळकर
[ पंढरीचा पाटील ]

★

[ राग : भीमपलास ; ताल : धुमाळी ]

श्रीरामनाम प्रिय झालें
कलियुगीं सत्ययुग आलें !

राव-रंक, साधू, संसारी
समान अवघे देवादारीं

सत्य चिरंतन रामनाम-धन
हृदय निरंतर धालें !

तान्हेल्या जीवांनो ! या
तहान अपुली शमवाया

या हो, प्या हो, रामरसाचे प्याले,
काळाचे चुकवा घाले !

गायक :
जी. एन्. जोशी

★

# दो दिसाचा पसारा !

[ राग : भीमपलासमिश्र ; ताल : केरवा व दादरा ]

दो दिसाचा पसारा
संसार वृथा सारा
जरि म्हणशी माझें माझें
कांहीं नसे तूझें !

थोडकी सराईतली
वसती तुझी इथली
जाण रे मुशाफीरा,
तूं येथुनि जाणारा !

जगीं खेळतसे माया
भुलवाया तुज वायां
शरण जा श्रीहरीला
तुजला मिळे निवारा !

गायक :
व्ही. जी. भाटकर

★

[ राग : मांडमिश्र ; ताल : धुमाळी ]

विटेवरी मूर्ति तुझी सांवळी
जगावर माया-पांखर घाली !

धांवत आला बावरला हा
व्याकुळला तान्हा ;
निज करुणेचा पाजिव पान्हा,

ठाव दे पायीं विठाई माउली !
विटेवरी मूर्ति तुझी सांवळी !

गायक :
व्ही. जी. भाटकर

★

# भारत माझा देव !

[ राग : जिल्हा – काफी ; ताल : केरवा ]

भारत माझा देव, धर्म, राजा !
त्याग ठसे मनिं पाही
स्वार्थ वसे नच लवही
तनु – मन – धनही वाही
विमल लोकहित – काजा
जगता जीवनदाता
विश्व – शांतिसुख – धाता
वरित अमरगुणसाजा

गायक : सुरेश हळदणकर

★

[ राग : मियामल्हार ; ताल : एकताल ]

करुणाघना, दे भगवाना,
सुखशांति मना
आळवुं जगिं कवणा तुजविणा ?
वितरी अभय-वरदाना ;
झणिं तारी संसारीं
शरणागत दीना
सफल सकल कर ना कामना !

गायक : भालचंद्र पेंढरकर

★

[ राग : भीमपलास ; ताल : त्रिताल ]

चांदरात मोही मनाला
वसुधाहि कशी खुले पाही !
दयिता प्रीति-सुधा-सरिता
विश्वदेवता पुजित अनंता
वाहि सुमांजलि ताऱ्यांची ही !

गायक : भालचंद्र पेंढरकर

# दे चरणिं आसरा !

[ राग : भैरवी ; ताल : त्रिताल ]

दे चरणिं आसरा देवा !
नाहिं तुझ्याविण थारा दुसरा ;
कटु असार संसार-पसारा !
दे चरणिं आसरा !
मी अजाण रे बालक दुर्बल
थोर परि मनीं भक्तिभाव-बल
जपत रुचिर तव नाम सुमंगल
वितरी चिरसुखशांति अंतरा
दे चरणिं आसरा !

गायक :
भालचंद्र पेंढरकर

★

रघुराज मनीं वदनीं वसला
ज्ञानदीप जीवनीं उजळला
तिमिर अंतरीं नुरला !
राम सदा नाचत नयनीं
रामनाम हें घुमलें श्रवणीं
व्यापुनि विश्वहि कण कण उरला
भुवनीं अवघा रामच भरला !

गायक :
सुरेश हळदणकर

★

[ राग : देस ; ताल : त्रिताल ]
किती बाई मधुर कलिका ही !
फुलवित जीवभाव जादुगिरी
गोड गोड नवलाई !
भ्रमर रसिक भुलला उगाच कां ?
हृदयीं लपविला जिवाचा सखा
प्रीत–रीत चतुराई !

गायक :
जे. एल्. रानडे

सं.
शुक्लांचीं
प्रत

## आपुला म्हण

तुझ्या कृपेचा जिवा निवारा
प्रभो, लाभुं दे दयासागरा !

सखा सोयरा तूं घननीळा !
वाहे तुज सर्वस्व दयाळा !

आपुला म्हण ह्या दीन किंकरा
दे मज निज पद-धूलिंत थारा
शरणागत मी तुज रघुवीरा !

*गायक :*
*व्ही. जी. भाटकर*

★

लावुनि आशा खुळ्या जिवाला
करी निराशा नशीब खोटें !

शोधुं जातां माणिक-मोतीं
शंख-शिंपला लागति हातीं
गुलाब तोडावयास जातां
जिवास बोचति विषारी कांटे !
करी निराशा नशीब खोटें !

मधु मंजुळ दिलरुबा दिलाचा
छेडुं लागतां प्रीतिबाला
पहा, अचानक तुटल्या तारा !
घनांधकारच मनांत दाटे !
करी निराशा नशीब खोटें !

*गायिका :*
*सौ. सरस्वती राणे*

★

# आली वसंतबहार !

आ ली वसंतबहार !
नटली दुनिया किति गुलजार !

फुलपांखरांनो ! या रे भरभर
साधुनि घ्या घडी ; जाईल झरझर
निरंतर न ये वसंत जीवनिं
प्रीतीच्या फुलत्या नंदनवनिं

आनंदानें, स्वच्छंदानें
करा विहार ! करा विहार !
फुलांफुलांतिल लुटा लुटा रे !
मधुसंभार ! आली वसंतबहार !

उकल हृदय सखे गुलाबकलिके !
खुलव नवतिचा नव शिणगार
भुलव भृंग साजण दिलप्यार
आ ली वसंतबहार !

रसिक तूं पुरा चतुरा भ्रमरा !
करि मंजुळ गुंजन - ललकार
रंजिव ह्या कलिका सुकुमार !
आ ली वसंतबहार !

*गायिका :*
*श्यामला माजगांवकर*

★

दे पदीं आसरा ह्या जना
रघुवरा, दुजी ना कामना
अंत बघावा किती दयाघना ?
जाण रे हृदयिंच्या भावना
विश्व - जीवना, पतितपावना,
शांतवी जिवाच्या यातना !

*गायक :*
*विष्णुपंत पागनीस*
[ संत तुळसीदास ]



# पांखरा, उडुनि जा!

[ राग : पहाडीमिश्र ; ताल : केरवा ]

पांखरा ! चल जा, उडुनि जा !
भिऊं नकोस कुणा
दुनियेंत तुझा तूं राणा !
कां उदास केविलवाणा ?
गोड लकेऱ्या छेड राया !
कां झुरतोस मनीं ?
मार भरारी उंच उंच रे !
खुल्या निळ्या गगनीं
दावि जगाला अखंड आपुला
स्वतंत्रतेचा बाणा !
खुणविते तुला, हिणविते पहा
कुणी गुणी मैना !
नव नवलाचा तिचा प्रीतिचा
अमोल घे नजराणा !

गायक :
जे. एल्. रानडे

★

[ राग : पहाडीमिश्र, ताल : केरवा ]

बघ, डुले झुले कलिका ही
लपुनी छपुनी हळूंच पाही
किती लाजत मुरकत राही !
साज बरवा नव नवलाचा वसंत आणी
वायूसंगें चालवि हितगुज सुगंधराणी
करि हांसे गोड बाई !

गायिका :
लीला लिमये

# सौभाग्य-तारा

[ राग : दरबारीमिश्र ; ताल : केरवा ]

जीवनीं उसळला सारा प्रळय-पसारा
निखळत हा सौभाग्य-तारा
जगिं नुरला जीवा निवारा !

गिरिकंदरही मंगल बनलें
मंदिर सुंदर नव बांधियलें
मूर्तिविना परि सुनेंच गमलें
वाहुं कुणा प्रीती-फुलोरा ?

लपसि कुठें हृदयाच्या राजा ?
अडली अर्घ्यावरती पूजा !
आग भडकली अंतरिं माझ्या
विझविति ना ह्या अश्रुधारा !

कोपलास देवा, दयाघना !
निर्दय दैवा ! कां नच करुणा ?
तूं तरि होई दयाळू मरणा !
मजसि अतां तूं एक थारा !
निखळत हा सौभाग्य-तारा !

*गायक :*
*जी. एन्. जोशी*

★

[ राग : भीमपलास ; ताल : त्रिताल ]

धरलास उगाच अबोला
सखये, अजुनि कशाला ?
फसवा रुसवा कळला !
तरळ चोरट्या अश्रूसंगें
हंसऱ्या नेत्रीं प्रीति तरंगे
वदनचन्द्र अनुरागें रंगे
बोलत मनिंच्या बोला !

*गायिका :*
*सौ. कालिंदी केसकर*



# लागे नाव झुकाया

[ राग : भैरवी ; ताल : धुमाळी ]

कुणीकडे ? कशी गडे ?
लागे नाव झुकाया राया !

अथांग दरिया गात उफाळत
नाचत खेळत
हांसत खिदळत
कशि जळवंती माया !

नाव डुलविती लाटा डगमग
कां मनिं तगमग ?
वरती झगमग
बघ देवांची दुनिया !

नव किरणांची टाकित रापण
चंद्रकोर पण ;
झपझप आपण
तारूं वल्हवूं सखया !

दूर दूर राहुं दे किनारा !
चल रे भरारा
जाऊं झरारा
क्षितिजाला कवळाया !

गायिका :
सुशीला वरदराजन

★

# नंदाघरीं !

नंदाघरीं आला हरी आनंदाचा कंद
हरि हा आनंदाचा कंद !
गोकुळीं कोंदला आनंदीआनंद
अवघा आनंदीआनंद !


सोनुला हा त्रिभुवनसुंदर
नटला बालमुकुंद
नाचरंगीं रंगला हा गोप - गोपिका - वृंद
बाई गोकुळ झालें धुंद !

मधुर मंगल मोहनाचा छंद हृदया लागला
नंदलाला हिंदवूंया ; पाळणा ग गाऊंया !
जो जो जो बाळा ! लडिवाळा !
नंदनंदना वेल्हाळा !
जो जो जो बा ळा ! घ न नी ळा !
गोविंदा ! गोपाळा !
गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या !

आला रे आला
गोविंद गोकुळिं आला !
आला रे आला
गोपाळ गोकुळिं आला !
गोविंद आला रे,
गोपाळ आला रे !
गोविंद गोपाळ !
गोविंद गोपाळ !

*गायिका :*
*प्रमोदिनी पाटकर*
[नंदकिशोर]

★



# धन-दौलत

[ राग : पहाडीमिश्र ;
ताल : कवाली ]

बग धन-दौलत माजी
दुनियेच्या मोलाची !
मोट हिरीवर गानं गाई
डोले बागमळा, आमराई !
गुनी गोजिरीं गुरं-ढोरं हीं
जीवप्रान साजनी जीं !
मिरगदेव अमृतघट ओती
धरतीवरती माणिक-मोतीं !
पिके पाचुचा मळा सभोंतीं
किर्पा करी प्रभूजी !
तूं सुगरण, मैतरीण नामी
तुज्या पीर्तिचा पाश रेशमी
तूंच गुणाची गवर लक्षुमी
जगामंदी मी गाजी !

गायक :
शाहू मोडक

★

[ राग : देस ; ताल : आध्धा ]

हांसती ह्या उपहासें तारा
कशि छळित रात सवत मला ?
मोहक माझा भाव-फुलोरा
नव यौवनभर सारा
तापद झाला, कां ओसरला ?
विरही जीवन शापच ठरला !

गायक :
सुरेश हळदणकर

# देव भावाचा भुकेला !

देव भावाचा भुकेला
गुंतला आणभाकेला
भावबळें वश केला
घेतसे धांव हांकेला !

घोर सांकडें निवारी
भक्तवत्सल कैवारी
सखा सज्जनांचा हरी
ताप सर्वथा संहरी !

आम्ही अजाण तान्हुलीं
भ्रमतसूं भव–भूलीं
घाली मायेची साऊली
तारी विठाई माऊली !

*गायक :*
*जयराम शिलेदार*
[ पंढरीचा पाटील ]

★

कोठें गुंतलासी पंढरीच्या राया !
किती करूं वायां आळवणी ?
जाण रे जिव्हाळा, भक्तिभाव भोळा
मिटूं नको डोळा करुणेचा !
आग अंतरींची शांतवी दयाळा,
उफाळल्या ज्वाळा प्रळयाच्या !
जीव तोडुनीया मारितसे हांक
दया-ब्रीद राख पांडुरंगा !
वोळवी दयेचा मेघ महोदारा !
कृपामृतधारा वोरसवी !

*गायक :*
*जयराम शिलेदार*
[ पंढरीचा पाटील ]

★



# 'सिंगल' खोली दे भगवान्!

'सिंगल' खोली दे भगवान्!
हवी तर पागडी घे भगवान्!

नको बंगला, नको 'फ्लॅट' रे,
'ब्लॉक' हि मी मागत नाहीं
दे रे एकच रूम मामुली
कुठेंहि असुं दे कसली ही!

बिजली-बत्ती नसली नसुं दे
नसुं दे खिडकी, नळ, मोरी
जुनीपुराणी भकासवाणी
असुं दे ओंगळ अंधेरी!

मच्छर, माशा, ढेंकुण, पिसवा
असूं देत झुरळे फार
हवा, उजेडहि मुळींच नसुं दे
मी नाहीं कुरकुरणार!

महालांत निजणारे पडले
हालांतच रस्त्यावरती!
स्मशानांतही जागा नाहीं
जिवंत ह्या देहापुरती!

गायक :
बबन नावडीकर
मधुबाला जव्हेरी

# दावि मार्ग नीट !

[ राग : जोगी – काफी-मिश्र ; ताल : केरवा व धुमाळी ]

मुशाफरीचा ये देवा ! पुरा पुरा वीट
पिशापरी अवघा जडला छंद तव अवीट !

रखडतों अखंड, सरे ना रुक्ष वाळवंट
जीव तापला तान्हेला, सुकुनि जाय कंठ
सारखीच कुठवर करणें अजुनि पायपीट ?

अस्तमान झाला, भवतीं रात्र घन तरंगे
फार भार शिरिं साहे ना, हृदय हें दुभंगे
उभे जागजागीं भलतें नव नवें अरिष्ट !

दीन लेंकरानें किति रे धिरावा धरावा ?
भरवंसा तुझा जीवाला एकला विसांवा
हात दयेचा दे ; आतां दावि मार्ग नीट !

गायिका :
श्यामला माजगांवकर

★

[ राग : मांड – पहाडीमिश्र ; ताल : केरवा – दादरा ]

कलिके, उमलूं नको गे
क लि का च  रा हे !

लाभ काय उमलुनियां ?
ताप जगाचा वायां !
सजला दावावया
तुजला माया-दया
बघ, धांवे खल भृंग मोहें

कलिके, उमलूं नको गे
कलिकाच राहे !

गायिका :
गंगूबाई हनगळ

★



# चला, राबुंया शेतावरती

गायक :
जयराम शिलेदार
[ पंढरीचा पाटील ]

चला, राबुं या शेतावरती !
आ पु न क र्द म र्द !
खेळवूं नशीब हातावरती !
शेती मोलाची मिरास
देई हिऱ्यामोत्यांची रास
करूं मशागत खूप कसून
वरुणदेव येईल मिर्गावर बसून
फुलविल खुलविल धरती
चला, राबुं या शेतावरती !
नांगरूं या वावर या रं
क रूं या धा न्या चं पे रं
पीक सोन्याचं झुलंल शिवारीं
दुनिया आमुची नवीन न्यारी
लक्ष्मीची किर्पा पुरती !
चला, राबुं या शेतावरती !

★

गायक :
भालचंद्र पेंढरकर

निवारा युवति–प्रीति नरा
रमणीविना रमणीयता
मोहकता लव ना भुवना
सुरेल जाणा ललनाप्रणय–वीणा
विमोही त्रिभुवना
करुनि रुचिर नवजीवन-गाना !

# माझ्या बागेंत !

माझ्या बागेंत आला ग माळी
कशि फुलवित जादू निराळी !
ठुमकत मुरडत उमले कळी
हळुं हळुं उकलत हृदय–पाकळी
किति नाजूक न्यारी नवाळी !
दुनयेची रस–रंग–झळाळी
लाजत हंसरी नजर न्यहाळी
जिवा भावाचीं गुंफून जाळीं !
वसंत हृदयीं फुले सदाचा
सुगंध कोंदत आनंदाचा
नव बहार तिन्ही त्रिकाळीं !

गायक :
जे. एल. रानडे

★

ह्या इथें मी सेविलें तें
स्वर्गसुख तूझ्यासवें
एकली पण आज राया,
ढाळितें मी आंसवें !
खोल राखेंतील फुलले,
झांकले अंगार ते
भग्न वीणा जीवनाची !
आस पुरती मालवे !
तार तुटली अन्तराची,
अजुनि कां झंकारते ?
उसळती बेसूर सारे
सूर गाण्याचे नवे !
बसुनि अन्धारीं स्मृतींचे
झुळवितें तुटले दुवे
घाव ओलावे उरींचा ;
चान्दणें ना साहवे !

गायक :
जी. एन्. जोशी



# आम्ही शेतकरी!

आम्ही शेतकरी शेतकरी !
धरतीचीं लाडकीं लेकरें
करूं तिची चाकरी !

शेत-मळे, बागाईत रानें
पिकवूं निढळाच्या घामानें
बनवुं सहज धूळीचें सोनें
किमया आमुची खरी !

कष्टांचे नित उपसुनि डोंगर
झट फोडूं खडकाला अंकुर
देऊं नव जीवन जगताला
स्वर्ग खेळवूं करीं !

दणगट मनगट, निधडी छाती
दैव आमुचें आमुच्या हातीं
सुखासमाधानानें खाऊं
सत्तेची भाकरी !

आम्ही अवघ्या दुनियेचे स्वामी
रंगुनि राहूं विठ्ठलनामीं
सखा आमुचा पाठीराखा
तो विश्वंभर हरी !

*गायक :*
*जयराम शिलेदार*
व इतर
[ पंढरीचा पाटील ]

★



# जीवित-पुष्प

बहुमोल मनुज-जीवित हें पुष्पच फुलें
ह्या जगदुद्यानीं नव सौंदर्यें खुलें !

स्वच्छंद वृत्ति रंगेलच फुलपांखरी
कुणि वरिति ; न करिती पारख किंमत खरी

भृंगापरि रंगुनि मधु-सेवनिं परि कुणी
साधिती स्वहित नित उद्योगी सद्गुणी

झरतसे सुखाशानंद मधुर मकरंद
करि धुंद विलासोपभोग सुन्दर छंद

जीवनीं त्यागशीलता वितरि माधुरी
पाहणें दुरूनच सुरेख शोभा पुरी !

सारुनी दुःख-कंटक धैर्यें बाजुला
सेवणें सौख्य-मधु जीवितपुष्पांतला !

मानवता-जनता-जगदीश्वर-पूजनीं
अर्पितां सुमन हें विकास पावे क्षणीं !

*गायक :*
*म. शं. कानेटकर*

REFBK-0007834

मुंबई-नभोवाणी-केंद्रा[illegible] सेंबर १९४६ पर्यंत
'सप्ताह-गीत' म्हणून [illegible] त केलें गेलें होतें.